Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

| VOL- XI | ISSUE- IV | APRIL | 2024 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 8.02 | ISSN 2349-638x |
|---|---|---|---|---|---|---|

# महाविद्यालयीन ग्रंथालयातील संशोधनास उपयुक्त उपक्रम : एक अभ्यास

**श्री.विठठल विश्वनाथ जाधव**
(संशोधक विद्यार्थी )
ग्रंथपाल,दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

**डॉ.विक्रम व्ही.गिरी**
ग्रंथपाल,
शहिद भगदसिंग महाविद्यालय, किल्लारी

***प्रस्तावना:***

महाविद्यालयीन पारंपरिक शैक्षणिक ग्रंथालये ही संशोधन आणि शैक्षणिक विकासासाठी महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. विविध उपक्रमांद्वारे, ही ग्रंथालये संशोधकांना आवश्यक साधने आणि संसाधने पुरवतात. या संशोधनामध्ये संशोधकाने शैक्षणिक ग्रंथालयातील विविध उपक्रमांचा अभ्यास केला आहे ज्यामुळे संशोधनाच्या गुणवत्तेत आणि कार्यक्षमतेत वाढ होते.

**उद्दिष्टे:**

1. शैक्षणिक ग्रंथालयांमध्ये उपलब्ध असलेल्या उपक्रमांचा आढावा घेणे.
2. या उपक्रमांच्या प्रभावशीलतेचा आणि परिणामकारकतेचा आढावा घेणे.
3. उपक्रमांच्या प्रभावाचे संशोधकांच्या शैक्षणिक कामगिरीवर होणारे परिणाम जाणून घेणे.

**ग्रूहितके:**

१. महाविद्यालयीन ग्रंथालयांमध्ये संशोधनस उपयुक्त प्रेरक उपक्रम राबविले जातात.

२. या उपक्रमांच्या प्रभावशीलतेचा आणि परिणामकारकतेचे मूल्यमापन करता येते.

३. उपक्रमांच्या प्रभावाचे संशोधकांच्या शैक्षणिक कामगिरीवर यशापयश अवलंबून आहे.

**संशोधन पद्धती :**

या अभ्यासासाठी सर्वेक्षण, मुलाखती, आणि आकडेवारीचा वापर करण्यात आला. संशोधकांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्न पारंपारिक महाविद्यालय ग्रंथालयांमध्ये उपलब्ध विविध उपक्रमांमध्ये सहभागी एकूण ७४ महाविद्यालयामधील ग्रंथपाल यांचेकडून प्रश्नावली भरून घेतली. तसेच प्राध्यापक व संशोधक विद्यार्थ्यांशी आणि ग्रंथालय कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

**अभ्यासाची व्याप्ती:**

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान अनुदानित महाविद्यालय ग्रंथालयापुरती मर्यादित आहे.

**उपक्रमांचा आढावा**

**१. ग्रंथ प्रदर्शन:**

महाविद्यालयामध्ये कोणतीही जयंती, पुण्यतिथी अथवा विविध कार्यक्रमाचे औचित्य साधून ग्रंथप्रदर्शननाचे आयोजन करावे. नवीन आलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तकांची माहिती होते. हा पारंपरिक उपक्रम अत्यंत प्रभावी आहे. ग्रंथालयातील विविध वाचन साहित्य जे की कपाटामध्ये बंदिशत असते त्यास त्यानिमित्ताने प्रदर्शनामध्ये सर्वासमोर येते. वाचकाना हवा असणारा ग्रंथ व ग्रंथास हवा असणारा वाचक मिळतो. अत्यंत स्तुत्य असा हा उपक्रम आहे.

**२. निर्देश सेवा उपक्रम :**

संशोधक वाचकांना आपल्या विषयातील संशोधन पेपर मागील कोणकोणत्या नियताकालकांमध्ये प्रकाशीत झाले आहेत याची माहिती तत्परतेने मिळेल. संशोधकाला सर्व वाचन साहित्यपैकी त्यातील नेमके कोणते वाचन साहित्य उपयोगाची आहे ते ठरवलेले नसते. शिवाय नेमकी कोणते वाचन साहित्य कुठे उपलब्ध आहे हे वाचकास माहिती नसते. या कारणामुळे ग्रंथालीन कर्मचारी वाचकास लागणाऱ्या

माहितीची ग्रंथालयातील जागा दर्शवतो. अशा सेवेस निर्देश सेवा असे म्हणतात.

**३. ग्रंथसंग्रह व नियतकालिके :**

ग्रंथालयाच्या उद्दिष्टानुसार व वाचकांच्या मागणीनुसार ग्रंथालयात विभिन्न, विश्वासहार्य आणि अध्यायावत ग्रंथ संग्रहाची व नियातकालिकांची वाढ करणे आवश्यक आहे. छापील, ऑनलाइन, ऑफलाइन स्वरूपातील वाचन साहित्य व त्या साहित्यासाठी लागणारी साधने उपलब्ध करून दिली पाहिजे सर्व माहिती साधने शासन विद्यापीठ अनुदान मंडळ आणि तत्सम मंडळाच्या निकषानुसार असावेत. ग्रंथालयात ग्रंथ पाठ्यपुस्तके संदर्भ ग्रंथ स्पर्धात्मक परीक्षेसाठीचे वाचन साहित्य, मानके, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रचलित नियतकालिके बॅक व्हॅल्यूम, सीडी, डीव्हीडी, दृक श्राव्य इत्यादी स्वरूपात ग्रंथ संग्रह असणे अपेक्षित आहे.

**४. तंत्रज्ञानाचा वापर करून घेता येणारे प्रेरक उपक्रम:**

१. ग्रंथालयाची स्वतंत्र वेबसाईट
२. ऑनलाइन ओपॅक
३. मान्यता प्राप्त सॉफ्टवेअरच्या मदतीने ग्रंथालय संगणकीकरण.
४. निवडक माहितीचे प्रसारण
५. डेटाबेस
६. ऑनलाइन फुल टेक्स्ट सर्विस
७. ऑनलाइन वाचक सल्लागार सेवा.
८. डिजिटल लायब्ररी
९. ई - रिसोर्स उपलब्धता
१०. डेटाबेस उपलब्धता
११. सोशल मीडियातून प्रसार
१२. संस्थात्मक भंडार

**५. मोफत इंटरनेट सुविधा:**

अद्यावत माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात अनेक संसाधने हि पारंपारिक चौकटीच्या बाहेर जात, नवीन स्वरुपात उपलब्ध होवू लागली आहेत. अश्या अमुलाग्र बदलांमुळे संसाधनाच्या उपयोगातील अनेक मर्यादा दूर झाल्या. वाचक व ग्रंथालयदरम्यान असणाऱ्या वेळ, स्थळ, अंतर, अश्या अनेक मर्याद दूर करत ग्रंथालायाची उपयोगिता वृद्धिंगत करणारी इंटरनेट सेवा विद्यार्थी व संशोधकासाठी अखंडित पणे उपलब्ध करून देणे हा देखील एक अत्यंत महत्वाचा प्रेरक उपक्रम आहे.

**६. वाचन आणि अभ्यासासाठी वातावरण:**

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्म समजला जातो तर शांतता हा ग्रंथालयाचा स्थायीभाव आहे. विद्यार्थी ग्रंथालयात अभ्यासासाठी येतात. त्यांचा अभ्यास चांगला झाला पाहिजे यासाठी अभ्यासिकेतील व्यवस्था अत्यंत चोख असली पाहिजे. परिसर रम्य असला पाहिजे. हवा खेळती असली पाहिजे आणि कसलाही गोंधळ होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. विद्यार्थ्यांच्या बसण्यामध्ये अंतर असले पाहिजे. खुर्च्या टेबल हे आवाज येणार नाहीत असे असले पाहिजेत.वाचन क्षेत्रात शांत आणि स्वच्छ वातावरण राखणे आवश्यक आहे.

**७. लेखन कार्यशाळा**


संशोधकांचे शैक्षणिक लेखन कौशल्ये वाढवणे आवश्यक आहे. त्यासाठी लेखन कार्यशाळा अत्यंत उपयोगी पडते.

**८. विशेष व्याख्याने आणि चर्चासत्रे**

संशोधन विषयक विशेष व्याख्याने आयोजित करणे. यामुळे ज्ञानात वाढ आणि नवीन संशोधन कल्पनांचा प्रसार होतो.

**माहितीचे विश्लेषण:**

१. संशोधनास उपयुक्त उपक्रम ग्रंथालयाचे सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी संशोधनास उपयुक्त उपक्रमांची माहिती सर्व ग्रंथपालांकडून मागविण्यात आली. सदर माहिती नुसार विश्लेषण खालील प्रमाणे.




आलेख १.

एकूण 74 ग्रंथपालांनी प्रश्नावलीच्या माध्यमातून संशोधनासाठी उपक्रमाबाबत माहिती पुरवलेली आहे. त्यापैकी ग्रंथ प्रदर्शन 30 टक्के महाविद्यालयात घेतले जाते. निर्देश सेवा 5 टक्के महाविद्यालयात, ग्रंथ व नियतकालिके संग्रह 23 टक्के महाविद्यालयात, तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम 14 टक्के महाविद्यालय तर वाचन आणि अभ्यासासाठी वातावरण 28% महाविद्यालयात आयोजित केले जाते. अशा पद्धतीने हा उपक्रम राबवला जात असल्याची माहिती मिळते.

**२. उपक्रमांचे मूल्यमापन:**

उपक्रमांच्या प्रभावशीलतेचे आणि परिणामकारकतेचे मूल्यमापन करण्यासाठी ग्रंथपालांना घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाबाबत प्रश्न विचारण्यात आला. या उपक्रमाचे मूल्यमापन ग्रंथपाल यांनी केलेले आहे.


| | ग्रंथ प्रदर्शन | निर्देश सेवा उपक्रम | ग्रंथसंग्रह व नियतकालिके | तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम | वाचन आणि अभ्यासासाठी वातावरण |
|---|---|---|---|---|---|
| **खूप चांगले** | 16 | 4 | 10 | 8 | 15 |
| **चांगले** | 21 | 6 | 12 | 12 | 18 |
| **समाधानकारक** | 14 | 11 | 15 | 18 | 12 |
| **बरे** | 10 | 16 | 19 | 15 | 18 |
| **साधारण** | 8 | 19 | 16 | 18 | 10 |
| **सांगता येत नाही** | 5 | 18 | 2 | 3 | 1 |

सारणी १

उपक्रमांचे मूल्यमापननामध्ये खूप चांगले, ग्रंथप्रदर्शन 22 प्रतिसद दात्यांचे म्हणणे आहे. वाचन आणि अभ्यासासाठी वातावरण 21 टक्के , ग्रंथसंग्रह व नियतकालिके 13 टक्के, तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम 11 टक्के, निर्देश सेवा उपक्रम 5 टक्के प्रतिसददाते म्हणत आहेत. यावरून सहज उपक्रमांचे मूल्यमापन होताना दिसत आहे.

**३. उपक्रमामुळे संशोधन कार्यात सुधारणा:**

उपक्रमामुळे संशोधन कार्यात सुधारणा होते का? याबाबतची मत ग्रंथपाल यांना विचारले होते. याशिवाय संशोधक प्राध्यापक यांच्याकडूनही माहिती घेतली याचे उत्तर खालील प्रमाणे मिळाले आहे.




उपक्रमामुळे संशोधन कार्यात सुधारणा होते असे 92 टक्के प्रतिसद दात्यांचे म्हणणे आहे. तर नाही असे 8 टक्के प्रतिसाद दाते म्हणत आहेत. उपक्रमामुळे संशोधन कार्य सुधारणा होतील हे निश्चित होते

***निष्कर्ष:***

शैक्षणिक ग्रंथालयातील विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचे आणि संशोधकांचे शैक्षणिक प्रदर्शन, संशोधन कौशल्ये, आणि आत्मविश्वास वाढतो. उपक्रमांच्या नियमित पुनरावलोकन आणि सुधारणा करून, ग्रंथालये संशोधन प्रक्रियेत अधिकाधिक मदत करू शकतात.

***शिफारसी :***

1. **नवीन उपक्रमांची अंमलबजावणी:** नवीन संशोधन तंत्र आणि साधनांची ओळख करून देणे.
2. **सहभाग वाढवणे:** उपक्रमांमध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांचा सहभाग वाढवण्यासाठी प्रेरणा देणे.
3. **परिणामांचे मापन:** उपक्रमांच्या परिणामकारकतेचे नियमित मापन आणि विश्लेषण करणे.

4. **संसाधनांची उपलब्धता:** अधिक डिजिटल आणि भौतिक संसाधनांची उपलब्धता सुनिश्चित करणे.
5. **सततचे प्रशिक्षण:** ग्रंथालय कर्मचाऱ्यांना सतत अद्ययावत प्रशिक्षण देणे.

**सार** :

शैक्षणिक ग्रंथालयांमधील उपक्रमांचे महत्त्व आणि त्यांचा संशोधनावर होणारा सकारात्मक प्रभाव स्पष्ट होतो. सतत सुधारणा आणि विद्यार्थ्यांच्या गरजांनुसार उपक्रमांची अंमलबजावणी केल्यास, शैक्षणिक आणि संशोधन समुदायाला अधिक लाभ होऊ शकतो. ग्रंथालयाच्या दृष्टीने उपक्रम अत्यंत महत्वाचे आहेत. विद्यार्थ्यांची संख्या वाढावी व दर्जेदार सेवा ग्रंथलयास देता येण्यासाठी संशोधनामध्ये उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे .

**संदर्भ ग्रंथ:**

१. आगलावे प्रदिप (२०१६) सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर श्री साईनाथ प्रकाशन.

२. आडसुळे, पांडुरंग (2015). ग्रंथालय संदर्भ सेवा आणि साधने, लातूर: गाथा प्रकाशन, पृष्ठ क्र. 19-20

३. कुंभार, राजेंद्र (२०१९-२० ) “सार्वजनीक ग्रंथालयासाठी काही नावीन्यपूर्ण उपक्रम" ज्ञानगंगोत्री डिसेंबर ते मे य.च.म.मु.वि.नाशिक पृ.क्र.८२

४. कुलकर्णी, व. वि. (1974). ग्रंथालय प्रशासन, नागपूर: सुविचार प्रकाशन मंडळ, पृष्ठ क्र. 222-223.

५. कोण्णूर, एम. बी. कोण्णूर सुजाता आणि माणगांवकर उषाप्रभा (नोव्हेंबर २००८). संप्रेषण डायमंड ग्रंथालय आणि माहितीशास्त्र कोश पुणे: डायमंड पब्लीकेशन्स पृ. ३०-२८१.